मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि. 18 जुलै 2024 | पान- 1

# महाविकास आघाडीत 'बिघाडी'

## खासदार अमोल कोल्हे यांचा भोसरीतील जनता दरबार रद्द : इच्छुक उमेदवार सुलभा उबाळे, धनंजय आल्हाट यांची अस्वस्थता

**पिंपरी | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी (अजित पवार) गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे व त्यांच्यासह २८ राष्ट्रवादीतील पदाधिकाऱ्यांनी आज शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला. आगामी विधानसभा निवडणूक लढविण्याची संधी मिळावी, याकरिता अजित गव्हाणे यांनी हा निर्णय घेतला असल्याचे सांगितले जात आहे. अजित गव्हाणे हे भोसरी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास इच्छुक आहे. त्यामुळेच त्यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला.

विशेष म्हणजे, भोसरी विधानसभा मतदारसंघावर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचाही दावा आहे. त्यानुसार उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे पदाधिकारी, माजी नगरसेविका सुलभा उबाळे, माजी नगरसेवक धनंजय आल्हाट यांच्यासह भोसरीतील शिवसेनेचे सर्व पदाधिकारी भोसरी विधानसभा मतदारसंघ आपल्या पक्षाला सुटावा, यासाठी प्रयत्न करत आहे. गव्हाणे यांच्या प्रवेशामुळे शिवसेनेतील किंबहुना महाविकास आघाडीतील अस्वस्थता वाढली आहे.

दरम्यान, सुलभा उबाळे यांच्या पुढाकाराने शिरुर लोकसभा मतदार संघातील राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी दि. १८ जुलै रोजी आयेजित केलेला जनता दरबार रद्द केला आहे. अजित गव्हाणे यांच्यामुळे महाविकास आघाडीतील निष्ठावंतांमध्ये असलेल्या नाराजीमुळे हा निर्णय घेतल्याची चर्चा आहे. तसेच, गव्हाणे यांचा प्रवेश पुण्यातील मोदीबाग येथे झाला. त्यावेळी खासदार कोल्हे उपस्थित नव्हते. त्यामुळे याबाबत अनेक तर्कवितर्क लढवले जात आहेत.




### निष्ठावंत शिवसैनिक 'मातोश्री'वर धडकणार...!

» भोसरी विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढविण्यासाठी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या माजी नगरसेविका सुलभा उबाळे निवडणूक लढविण्यास इच्छुक आहे भोसरी विधानसभा मतदारसंघात त्यांनी या अनुषंगाने आपले काम सुरू केले आहे. हा मतदारसंघ शिवसेना पक्षाला सुटावा यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु आज अजित गव्हाणे यांनी भोसरी विधानसभा मतदारसंघ लढविण्यासाठी शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश केल्याने भोसरी मधील उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजीचा सूर उमटला. तसेच भोसरी विधानसभा मतदारसंघ हा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाला सुटावा, अशी मागणी करण्यासाठी हे सर्व पदाधिकारी उद्या मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन आपली मागणी करणार असल्याचे सांगितले जात आहे.

### पदाधिकारी नाराज

» या विषयावर चर्चा करण्यासाठी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना वतीने बैठक झाली. या बैठकीत अजित गव्हाणे यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्याने आपण सर्व नाराज झाल्याचे सांगितले आहे. तसेच शिरूर लोकसभा मतदारसंघात खा. डॉक्टर अमोल कोल्हे यांच्या विरोधात काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना आज शरद पवार यांनी पक्षात प्रवेश दिल्यानेही आपण नाराज असल्याचे या पदाधिकाऱ्यांनी प्रसार माध्यमांना सांगितले आहे.




# पिंपरी चिंचवडमधील पक्षाची पडझड रोखण्यासाठी अजित पवार 'ॲक्शन मोड'मध्ये..!

## नवीन शहराध्यक्ष पदाबाबत चर्चा आणि 'आउटगोइंग' रोखण्यासाठी सर्किट हाऊस येथे बोलवली तातडीची बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा बालेकिल्ला असलेल्या पिंपरी चिंचवड मध्ये सुरू लागला आहे. शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्यासह भोसरी विधानसभेतील अनेक माजी नगरसेवकांनी अजित पवारांची साथ सोडत शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ही पडझड रोखण्यासाठी अजित पवार आता 'ॲक्शन मोड'मध्ये आले आहेत.त्यांनी सुरू असलेली आउटगोइंग रोखण्यासाठी आणि नवीन शहराध्यक्ष पदाबाबत चर्चा करण्यासाठी (दि.१८) सकाळी ८ वाजता पुण्यातील नवीन सर्किट हाऊस येथे आजी, माजी नगरसेवकांसह सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावली असल्याची माहिती मिळत आहे.

सूत्राने दिलेल्या माहितीनुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यात पिंपरी चिंचवड शहरातील माजी नगरसेवक तसेच प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली आहे. सध्या भोसरी विधानसभेतील बरेच पदाधिकारी व माजी नगरसेवक यांचा शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षात प्रवेश झाला आहे. त्याच अनुषंगाने सुरू असलेली ही पडझड रोखण्यासाठी पक्ष संघटना टिकवण्यासाठी उपाययोजना यावर चर्चा केली जाणार आहे.



### शहराध्यक्ष पदाकरिता यांच्या नावावर चर्चा

» सध्या भोसरी विधानसभेतील बरेच पदाधिकारी व माजी नगरसेवक यांचा शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षात प्रवेश झाला आहे. त्याच अनुषंगाने सुरू असलेली ही पडझड रोखण्यासाठी पक्ष संघटना टिकवण्यासाठी उपाययोजना यावर चर्चा केली जाणार आहे. तसेच नवीन शहराध्यक्ष पदाकरिता माजी महापौर योगेश बहल, माजी विरोधी पक्ष नेते नाना काटे, ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भोईर, जगदीश शेट्टी यांच्या नावावर चर्चा होऊ होणार आहे.

# आदेश निघाला, पण मार्गदर्शक तत्वेच नाहीत

## लेखी परिपत्रक अद्याप प्राप्त झाले नाही, त्यामुळे महाविद्यालयांमध्ये आणि विद्यार्थिनिंना मोफत शिक्षणाबाबत संभ्रम

**पुणे | प्रतिनिधी**

व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या मुलींना शिक्षण व परीक्षा शुल्क संपूर्णत: माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश उच्च व तंत्र शिक्षणमंत्र्यांनी दिले. मात्र, या संदर्भात राज्य सरकाकडून मार्गदर्शक तत्वे अथवा लेखी परिपत्रक अद्याप प्राप्त झाले नाही. त्यामुळे प्रवेश शुल्काबाबत महाविद्यालयांमध्ये संभ्रमावस्था आहे.

मोफत शिक्षणाबाबत शासनाच्या अध्यादेशाची प्रत घेऊन पालक महाविद्यालांमध्ये चौकशीला जात आहेत. त्यावरून पालक आणि महाविद्यालयांच्या कर्मचाऱ्यांमध्ये वादाची स्थिती उद्भवत आहे. त्यामुळे प्रवेशाचा संभ्रम दूर करण्यासाठी शासनाने तत्काळ या निर्णयाची कार्यपद्धती जाहीर करावी, अशी मागणी केली जात आहे.

राज्य सरकारने व्यावसायिक शिक्षण मोफत देण्याचे निर्णयाचे स्वागत आहे. या संदर्भात महाविद्यालय व संस्थांकडे विचारणा केली असताना मोफत मुलींच्या शिक्षणाबाबत तंत्रशिक्षण विभाग अथवा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून काहीच परिपत्रक निघाले नाही. तुयामुळे कोणत्या आधारावर मुलींना प्रवेश द्यायचा, असाही प्रश्न महाविद्यालयांपुढे पडला आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर मुलींना मोफत शिक्षण देण्यासंदर्भात नेमकी कार्यपद्धत काय असणार आहे, याविषयी महाविद्यालयेही अनभिज्ञ आहेत. त्यांच्याकडून उच्च शिक्षण विभागाशी संपर्क साधण्यात येत आहे. मात्र, त्यांनाही काहीच प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र आहे.

शुल्क भरल्याशिवाय मुलींना प्रवेश नाकारणाऱ्या संस्थांची मान्यता रद्द करण्यात येणार असल्याचा स्पष्ट इशारा उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिला.



### विद्यार्थिनिंची संख्या वाढली

» उच्च शिक्षणाची खाते हाती घेतल्यानंतर राज्यातील विद्यार्थिसंख्या ३३ लाख होती. “स्कूल कनेक्ट’सारखे उपक्रम राबवून, रात्रंदिवस काम करून मुले-मुले मिळून विद्यार्थिसंख्या ४३ लाख झाली. दहा लाख विद्यार्थी वाढले. ही संख्या ५० लाखांवर नेण्याचे उद्दिष्ट आहे. मुलींच्या शुल्कमाफीमुळे ही संख्या मोठ्या प्रमाणात वाढणार आहे, असेही चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

### महाविद्यालयांना पडलेले प्रश्न

- » प्रवेश शुल्क कसे आकारायचे ?
- » शुल्क आकारण्याची नियमावली काय ?
- » शासन कशा प्रकारे प्रतीपूर्ती करणार ?
- » कोणत्या अभ्यासक्रमासाठी किती शुल्क माफी होणार ?
- » प्रवेशावेळी शुल्क आकारायचे की नाही ?
- » चालू वर्षासाठी शुल्क आकारलेले असल्यास परत द्यायचे का ?

### पालकांना पडलेले प्रश्न..

- » पूर्ण शुल्क माफ होणार, की शैक्षणिक शुल्क ?
- » प्रवेश घेतानाच शुल्क द्यावे लागणार का ?
- » प्रवेश शुल्क आधी भरल्यास नंतर ते परत मिळणार का ?
- » एकापेक्षा जास्त वर्षासाठीचा अभ्यासक्रम असल्यास माफी होणार का ?
- » यंदाचे अभ्यासक्रमाचे शेवटचे वर्ष असल्यास भरलेले शुल्क परत मिळणार का ?
- » कोणत्या अभ्यासक्रमासाठी किती शुल्क माफ होणार ?

> माझी मुलगी आता अभियांत्रिकी पदवीच्या द्वितीय वर्षाला शिकत आहे. त्यासाठी महाविद्यालयाकडून शिक्षण शुल्क भरण्याचा तगादा सुरू आहे. त्यामुळे फक्त पहिल्याच वर्षी प्रवेश घेणाऱ्या मुलींनाच शुल्क माफ होणार आहे, की अभियांत्रिकीच्या सर्व वर्षातील मुलींचे शुल्क माफ केले जाणार आहे? याविषयी महाविद्यालयांकडून शासनाची नियमावली आली नसल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे आमची अडचण झाली आहे
>
> - एक पालक

# बाजार समितीतील ‘वसुली’मुळे व्यापारी मेटाकुटीला

## कामकाजाबाबतही व्यापाऱ्यांकडून तक्रारी वाढल्या, पणन सहसंचालकांकडून कनिष्ठ लिपीकांच्या चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

सेवाज्येष्ठतेनुसार नियुक्ती करणे अपेक्षित असताना शेकडो कर्मचाऱ्यांना डावलून कनिष्ठ लिपीकांची भुसार विभागप्रमुख व वाहन प्रवेश विभाग पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या कामकाजाबाबतही व्यापाऱ्यांकडून तक्रारी वाढल्या आहेत, त्यामुळे त्यांची नियुक्ती नियमबाह्य ठरवावी, त्यांची चौकशी करावी, अशी लेखी मागणी सुहास बनसोडे यांनी पणन संचालक, सहसंचालक व कृषी उत्पन्न बाजार समितीकडे केली होती. त्यानुसार कनिष्ठ लिपीकांच्या चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.



कनिष्ठ लिपीकांच्या पदोन्नती नियुक्तीनंतर त्यांच्या विरोधात अनेक व्यापाऱ्यांच्या सुद्धा तक्रारी आहेत. मात्र या तक्रारींकडे वरिष्ठांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचेही व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे, यासर्व गोष्टींची दखल घेत याबाबत स्पष्टीकरण द्यावे तसेच बाजारस्तरावर चौकशी करण्यात यावी, यासंदर्भातील अहवाल तत्काळ द्यावा, असे आदेश पणन विभागाचे सहसंचालक राजेंद्रकुमार दराडे यांनी दिले आहेत. परंतु, संबंधीतास पदावर ठेवून चौकशी नैसर्गिक न्यायतत्त्वावर करणे उचित ठरणार नाही, असे व्यापाऱ्यांचे मत आहे.

दरम्यान, मार्केट यार्ड येथील भुसार बाजारात गाळेधारकांना सेस, दप्तर तपासणी, व्यापार परवाने देणे याबाबत विविध प्रकारांच्या नोटीसा पाठवून कारवाईचा फार्स दाखवून विशेष शुल्क घेतले जात असल्याचे प्रकार होत असल्याचे व्यापारी सांगतात, व्यवसाय परवाना नूतनीकरण देण्यासाठी अर्ज देण्यास टाळाटाळ केली जाते, अर्थिक पूर्तता केली नाही तर अन्य कागदपत्रांची कारणे सांगून कामे पेंडींग ठेवून त्रास दिला जातो, असे एका व्यापाऱ्याने नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर सांगितले.

विशेष म्हणजे, बाजारसमितीच्या गैरकारभारावर आमदार माधुरी मिसाळ यांनी नाराजी दर्शवत मागील महिन्यांतच संबंधीत अधिकाऱ्यांची कार्यालयात जाऊन कानउघडणी केली होती.

> व्यापाऱ्यांना विविध प्रकारे चौकशीच्या नोटिसा पाठवून नाहक त्रास दिला जातो, दुकानास परवाने देताना नाहक अडवणूक केली जाते, व्यापाऱ्यांनी न्याय मागण्या केल्यास सूड उगवला जातो. वरिष्ठांनी पारदर्शक व प्रामाणिकपणे चौकशी केल्यास मोठे गभाड सापडण्याची शक्यता आहे. व्यावसायिक अडचणीमुळे व्यापारी त्रस्त असताना असे प्रकार तातडीने बंद झाले नाहीत तर मी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार करणार आहे.
>
> - प्रविण चोरबेले , माजी अध्यक्ष, पुणे मर्चंट चेंबर

> पणन विभागाचे सहसंचालकांनी माझ्या कामकाजाची चौकशी करण्याचे आदेश दिल्याबाबत मला माहिती नसून कार्यालयातून माहिती घेऊन बोलणे योग्य राहील. व्यापाऱ्यांना नेहमीच सहकार्य करीत आलो आहे.
>
> - प्रशांत गोते, कनिष्ठ लिपीक, कृषी उत्पन्न बाजार समिती

# सर्वेक्षणात आढळणाऱ्या मालमत्तांच्या सुनावणीसाठी यंत्रणा सज्ज

## सात ठिकाणी सुनावणी केंद्र निश्चित : ऑफलाईन आणि ऑनलाईन सुविधा उपलब्ध

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरातील नवीन, वाढीव अशा मालमत्तांचे अत्याधुनिक ड्रोनच्या सहाय्याने सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. या सर्वेक्षणात आढळलेल्या मालमत्ता धारकांना विशेष नोटीसही तत्काळ देण्यात येत आहे. ज्या मालमत्ता धारकांचे कर आकारणीबाबत हरकत, आक्षेप असतील, अशा मालमत्ता धारकांच्या सुनावणीसाठी शहरातील विविध भागात सात ठिकाणी सर्व सुविधांयुक्त केंद्र निश्चित केली आहेत. ऑफलाईनसह ऑनलाईनचीही यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे.




पिंपरी-चिंचवड शहरात सध्यस्थितीत 6 लाख 30 हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. मात्र त्यानंतरही शहर परिसरात नोंदणी नसलेल्या सुमारे दोन लाख नवीन आणि वाढीव बांधकाम असलेल्या मालमत्ता आढळण्याचा महापालिका प्रशासनाचा अंदाज आहे. त्यामुळेच आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी नवीन, वाढीव अशा मालमत्तांचा अत्याधुनिक ड्रोनच्या सहाय्याने सर्वेक्षण करण्याचा महापालिकेच्या इतिहासात प्रथमच ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. त्यानुसार मालमत्ता सर्वेक्षणासाठी महापालिकेने स्थापत्य कन्सल्टंट प्रा. लि. कंपनीची नियुक्ती केली असून सर्वेक्षणास प्रारंभ झाला आहे.

सर्वेक्षणात आढळलेल्या नवीन मालमत्ता धारकांना कर आकारणीबाबत पहिली विशेष नोटीस बजाविण्यात येत आहे. या नोटीसबाबत मालमत्ता धारकांची काही हरकत, आक्षेप असल्यास संबंधित झोन कार्यालयात लेखी तक्रार दाखल करता येईल. यासाठी महापालिकेने सात ठिकाणी सुनावणी केंद्र निश्चित केले आहेत. सुनावणीसाठी आक्षेप असलेल्या आपल्या मिळकतीची सर्व कागदपत्रे मालमत्ता धारकांनी आणल्यानंतर तत्काळ सुनावणी घेण्यात येणार आहे.

### ही आहेत सुनावणीची सात ठिकाणे

1) वाकड, थेरगाव, किवळे, कस्पटे वस्ती- वाकड विभागीय कार्यालय (नवीन कार्यालय इमारत), तेजस इंपेरीया, वाकड पोलीस चौकी शेजारी, भुजबळ चौक, वाकड.

2) आकुर्डी, निगडी, चिंचवड- आकुर्डी विभागीय कार्यालय-पांडुरंग काळभोर सभागृह, पांढारकर नगर, आकुर्डीगाव.

3) सांगवी, मनपा भवन, फुगेवाडी-दापोडी- फुगेवाडी-दापोडी विभागीय कार्यालय मनपा दवाखाना इमारत, पहिला मजला, रेल्वे गेट जवळ, कासारवाडी.

4) तळवडे, चिखली- तळवडे विभागीय कार्यालय-श्री. स्वामी समर्थ सांस्कृतिक भवन, सेक्टर नं. 21, शिवभूमी विद्यालयाजवळ, यमुनानगर, निगडी.

5) मोशी, भोसरी-मोशी विभागीय कार्यालय (नवीन कार्यालय इमारत) सन हार्मोनी, तळमजला गाळा क्र. 1 ते 4, शिवाजीवाडी, मोशी.

6) दिघी, च-होली- दिघी विभागीय कार्यालय लोटस पॅराडाईज, पहिला मजला, दत्तनगर, दिघी.

7) पिंपरी वाघेरे, पिंपरी नगर- जुने दुय्यम निबंधक कार्यालय इमारत कै. नंदकुमार जाधव उद्यान समोर, अशोक चित्रमंदिर जवळ, पिंपरी.

### ऑनलाईन सुनावणीचीही सुविधा उपलब्ध

**» मालमत्ता धारकांसाठी सात ठिकाणी सुनावणी केंद्र निश्चित केली आहे. मात्र, अनेक मालमत्ता धारकांना प्रत्यक्ष सुनावणीसाठी हजर राहणे शक्य होणार नाही. ही बाब लक्षात घेऊन महापालिकेच्या वतीने ऑनलाईन सुनावणीचीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी स्कॅन कोडही दिला आहे. या कोडवर स्कॅन केल्यास संबंधितांना त्वरित सुनावणीची तारीखही दिली जाते.**

### 24 हजार मालमत्ता धारकांना बजावली विशेष नोटीस

**» सर्वेक्षणात आढळलेल्या 24 हजार नवीन आणि वाढीव मालमत्ता धारकांना महापालिकेच्या वतीने प्रथम विशेष नोटीस बजावली आहे. या आठवड्यात 30 हजार तर 31 जुलैपर्यंत 75 हजार जणांना प्रथम विशेष नोटीस देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.**

# 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेस तांत्रिक अडचणींचा अडसर

## अर्ज ऑफलाईन भरण्याच्या आयुक्त शेखर सिंह यांच्या सूचना : पुढील कार्यवाही क्षेत्रीय कार्यालय स्तरावर करण्याचा सुचवला पर्याय

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा अर्ज भरण्यासाठी विविध तांत्रिक अडचणी निर्माण होत असून त्यासाठी बराच वेळ खर्ची होत आहे. त्या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या केंद्रांवर ज्या पात्र महिलांचे अर्ज भरण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्यांचे आवश्यक कागदपत्रांसह ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरून घेऊन त्यानंतर ते अर्ज क्षेत्रीय कार्यालयस्तरावर ऑनलाईन पद्धतीने भरावेत, अशा सूचना आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

या योजनेच्या अनुषंगाने पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा अर्ज भरण्यासाठी विविध तांत्रिक अडचणी सामना करावा लागत असल्याने त्यावर योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष केंद्रांवर भेट देऊन संबंधित समस्यांचे निराकरण करून आवश्यक उपाययोजना करावी. नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी. आवश्यकता असल्यास कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी. योग्य समन्वय साधून अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला वेग देण्यात यावा. दैनंदिन कामाचा अहवाल संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी समाज विकास विभागास वेळोवेळी सादर करावा, अशा सूचना आयुक्त सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.



या बैठकीला अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, सहआयुक्त चंद्रकांत इंदलकर, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, सह शहर अभियंता बाबासाहेब गलबले, ज्ञानदेव जुंधारे, उपायुक्त विठ्ठल जोशी, मनोज लोणकर, अण्णा बोदडे, राजेश आगळे, क्षेत्रीय अधिकारी सुचेता पानसरे, अमित पंडित, अजिंक्य येळे, उमेश ढाकणे, डॉ. अंकुश जाधव, सीताराम बहुरे, साहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, तानाजी नरळे, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी अनिता कोटलवार, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### नोडल अधिकारी म्हणून क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे जबाबदारी

राज्य सरकारच्या महिला व बाल विकास विभागाच्या वतीने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी तसेच महिलांच्या सोयीसाठी महापालिकेच्या वतीने क्षेत्रीय स्तरावर नियोजन करण्यात आले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थींना अर्ज भरणे तसेच स्वीकृतीसाठी महापालिकेच्या वतीने शहरात विविध ठिकाणी १० जुलैपासून शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

### मार्ग काढण्यासाठी उपाययोजना

**» महापालिकेच्या केंद्रांवर ज्या पात्र महिलांचे अर्ज भरण्यास अडचणी निर्माण होत आहेत त्यांचे आवश्यक कागदपत्रांसह ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरून घेऊन त्यानंतर ते अर्ज क्षेत्रीय कार्यालय स्तरावर ऑनलाईन पद्धतीने भरण्यात येणार आहेत. अर्ज भरताना लाभार्थीच्या मोबाईल क्रमांकावर ओटीपी पाठवला जातो, जो अर्जात नमूद करणे अनिवार्य आहे. यासाठी महापालिकेच्या वतीने एक विशिष्ठ क्रमांक तयार करण्यात येणार असून त्यावरून लाभार्थींना संपर्क करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेच्या वतीने देण्यात आली आहे.**

# अतिक्रमण विभागाचीही धडक कारवाई!

## विविध भागातील 15 हजार चौरस फूट बांधकामावर कारवाई : 23 जुलैपर्यंत धडाका कायम राहणार




**पुणे | प्रतिनिधी**

पोर्शे अपघात आणि ड्रग्ज पार्टीनंतर शहरात धडक कारवाईचे सत्र सुरू झाले आहे. पुणे शहरातील प्रत्येक ठिकाणी वाढत्या अतिक्रमणावर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी तसेच राजकीय नेत्यांनी केली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आदेश दिल्यानंतर पुणे महापालिकेच्या बांधकाम विभागाने कारवाई केली. आता अतिक्रमण विभागाने धडक कारवाई सुरू केली आहे. ही कारवाई २३ जुलैपर्यंत सुरू राहणार आहे. या कारवाईत १५ हजार चौरस फूट बांधकामावर कारवाई केली आहे.

विविध क्षेत्रीय कार्यालयाने कारवाई केली असून त्यासाठी क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक, बांधकाम विभाग अभियंता, अतिक्रमण निरीक्षक, पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा बलाने १० जेसीबी, १५ ट्रक, ५ गॅस कटरच्या मदतीने ही कारवाई केली. विविध क्षेत्रीय कार्यालयांनी केलेल्या कारवाईचा तपशील असा. येरवडा-कळस-धानोरी क्षेत्रीय कार्यालय, विश्रांतवाडी रस्ता, शिवाजीनगर-घोले रोड क्षेत्रीय कार्यालय-जंगली महाराज रस्ता, एफ.सी.रस्ता परिसर, सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय-सिंहगड रस्ता, वानवडी-रामटेकडी क्षेत्रीय कार्यालय-शिवरकर रस्ता, एनआयबीएम रस्ता, भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय-नेहरू रस्ता या ठिकाणी कारवाई करण्यात आली.

या कारवाईत १५ हजार चौरस फूट कच्चे-पक्के बांधकाम, सात स्टॉल, १५ हातगाडी, १६ पथारी, ४७ शेड, ५७ इतर, १३ सिलेंडर आणि एका वाहनावर कारवाई केली.

पुणे महापालिकेच्या हद्दीतील पदपथ, फ्रंट मार्जिन, साईड मार्जिनमधील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे, अनधिकृत बोर्ड, बॅनर, होर्डिंग निर्मूलन कारवाईचे नियोजन करण्यात आले आहे. महापालिका आयुक्तांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., शहर अभियंता प्रशांत वाघमारे, अतिक्रमण विभागाचे प्रमुख माधव जगताप, राजीव नंदकर यांच्या आदेशाने कारवाई केली. यापुढेही अशी संयुक्त कारवाई मोहीम चालू राहणार आहे. ज्या नागरिकांनी किंवा व्यावसायिकांनी अनधिकृत अतिक्रमण केले असतील, त्यांनी स्वतःहून काढून घेऊन पुणे पालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन अतिक्रमण विभागाने केले आहे.

### 23 जुलैपर्यंत थेट कारवाई

» नागरिकांना अतिक्रमणाचा सामना करावा लागत आहे. मध्यवर्ती भागातील पेठांसह, बाजारपेठा शिवाय इतर रस्त्यांवर अतिक्रमणे वाढली आहेत. त्यामुळे नागरिकांना रस्त्यावरून जाताना जीव मुठीत धरून जावे लागत आहे. त्यावर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुणे पालिका प्रशासनाला राजकीय दबावाला बळी न पडता थेट कारवाईचे निर्देश दिले होते. त्यानंतर पालिकेने शहरातील पाच झोनमध्ये अतिक्रमण कारवाईच्या नियोजनाचा आराखडा तयार केला आहे. त्यानुसार शहरात २३ जुलैपर्यंत थेट कारवाई केली जाणार आहे.

# गरीब रुग्णांवर यापुढे तातडीने उपचारांचे बंधन

## गरीब रुग्णांवर तातडीने उपचार : धर्मादाय कायद्यात आमूलाग्र बदल प्रस्तावित



**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम कायद्यात राज्य सरकारने आमूलाग्र बदल प्रस्तावित केले आहेत. याबाबतचे विधेयक विधिमंडळात सादर केले आहे. यापुढे बदल अहवालाची (चेंज रिपोर्ट) चौकशी सुरू झाल्यापासून वर्षात पूर्ण करावी लागेल; तसेच गरीब रुग्णांवर तातडीने उपचार करावे लागतील.

राज्यातील धार्मिक स्थळे, शैक्षणिक व वैद्यकीय संस्था तसेच धर्मादाय ट्रस्ट यांच्यावर महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० या कायद्यान्वये अंकुश ठेवला जातो. त्या कायद्यात बदल करण्याचे विधेयक राज्य सरकारने मांडले आहे. त्यामुळे आता भविष्यात काही बदल होणार आहेत. धर्मादाय रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांवर उपचार करताना जास्तीत जास्त गरजूंना समाविष्ट करून घेण्यासाठी कलम '४१एए'चे निकष विस्तृत करण्यात आले आहेत.

धर्मादाय कायद्यात सुधारणा करताना संगणकीकृत अभिलेखा जतन करण्यास विशेष महत्व देण्यात आले आहे. तसेच धर्मादाय अस्थापनेमधील रिक्त पदे भरण्यासाठी विधी पदवी धारक लिपिक प्रवर्गातील जास्तीत जास्त सक्षम व्यक्तींना व वकिलांना सामावून घेण्यास काही अटी शिथील करण्यात आल्या आहेत. विधीमंडळाच्या दोन्ही सदनांनी हे शासकीय विधेयक मंजूर केले आहे. राज्यपालांच्या अभिस्वाकृती नंतर या तरतूदी लगेचच संपूर्ण राज्यात लागू होतील, असे विधेयकात तरतुदी आहेत. यामुळे मोठे बदल होणार असल्याचे संकेत आहेत.

> राज्य सरकारने प्रस्तावित केलेल्या सुधारणांमुळे धर्मादाय कार्यालयांमधील कामकाज गतिमान होऊन असंख्य ट्रस्टच्या कामकाजामधील शैथिल्य दूर होईल.
>
> **- ॲड. शिवराज कदम जहागीरदार, माजी अध्यक्ष, पब्लिक ट्रस्ट प्रॅक्टिशनर्स असोसिएशन, पुणे**

### प्रस्तावित बदल नेमके काय?

» गरीब, अत्यवस्थ रुग्ण आल्यास त्याच्यावर तातडीने उपचार सुरू करण्याचे रुग्णालयांना निर्देश

» तहसीलदारांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला, पिवळे रेशन कार्ड अथवा अल्प उत्पन्न गटाचे सरकारी ओळखपत्र, पॅनकार्ड हे पुरावे ग्राह्य मानले जातील.

» ट्रस्टची जमीन विक्री, विकसन वा भाडेपट्ट्याने देण्याच्या पूर्वपरवानगी अर्जावर सहा महिन्यांत कार्यवाही बंधनकारक केली जाणार आहे. विहित मुदतीत आदेशाची अंमलबजावणी न झाल्यास त्याचे स्पष्टीकरण संबंधित अधिकाऱ्यांना द्यावे लागेल.

» धर्मादाय कार्यालयातील विविध अर्जांचे न्यायालयीन शुल्क वाढवण्यात आले आहे. ट्रस्ट नोंदणी अर्ज, बदल अर्जांना १०० ऐवजी २०० रुपयांचे तिकीट लावावे लागेल.

» जमीन विक्री परवानगी अर्जांना आता मूल्यांकनानुसार किमान ५० रुपये ते कमाल ३००० रुपयांचे शुल्क भरावे लागेल.